RNI No. MAHBIL /2009/31745
Reg. No. MCS/175/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ३, अंक ८] बुधवार, फेब्रुवारी ८, २०१७/माघ १९, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

### असाधारण क्रमांक १२

### प्राधिकृत प्रकाशन

### सामान्य प्रशासन विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ फेब्रुवारी २०१७

### अधिसूचना

**परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१.**

क्रमांक सार्वसु. १११७/७५/प्र.क्र. २३/२९.—परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ (१८८१ चा अधिनियम २६) च्या कलम २५ मध्ये दर्शविलेल्या व भारत सरकारच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक-३९/१/६८/जेयुडीएल-तीन, दिनांक ८ मे १९६८ अन्वये महाराष्ट्र शासनास सोपविलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमांतर्गत जळगाव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली या १५ जिल्हापरिषदांकरिता त्यांच्या कार्यक्षेत्रात व त्याअंतर्गत १६५ पंचायत समित्यांच्या क्षेत्रामध्ये, सार्वत्रिक निवडणुकांच्या मतदानाच्या दिवशी गुरुवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करीत आहे. मात्र यातील गडचिरोली जिल्हापरिषदेअंतर्गत कोरची, कुरखेडा, देसाईगंड (वडसा), आरमोरी, गडचिरोली, धानोरा, चामोर्शी व मुलचेरा या ८ पंचायत समिती क्षेत्रापुरती सदरची सुट्टी मर्यादित राहील.

त्याचप्रमाणे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अमरावती व गडचिरोली या ११ जिल्हा परिषदांकरिता त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये व त्याअंतर्गत ११८ पंचायत समित्यांच्या क्षेत्रामध्ये तसेच बृहन्मुंबई, ठाणे, उल्हासनगर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, अकोला, अमरावती व नागपूर या १० महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये सार्वत्रिक निवडणुकांच्या मतदानाच्या दिवशी मंगळवार, दिनांक २१ फेब्रुवारी २०१७ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करीत आहे. मात्र यातील गडचिरोली जिल्हा परिषदेअंतर्गत, अहेरी, एटापल्ली, भामरागड व सिरोंचा या ४ पंचायत समिती क्षेत्रापुरती सदरची सुट्टी मर्यादित राहील.

मंत्रालयातील सर्व विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदरची अधिसूचना त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मंडळे/महामंडळे इ. निमशासकीय कार्यालयांच्या निदर्शनास आणावी व त्यांच्या कर्मचाऱ्यांनाही वरील सवलत देण्याबाबत सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. मा. जाधव,
शासनाचे उप सचिव.